# अमरावती महानगरपालिका, अमरावती
## दिनांक 29.09.2022 रोजी प्राप्त प्रशासकीय विषय

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक 33** - मौजा- पेठ येथील भु. क्र. 07, शिट क्र. 64, सर्व्हे नं. 40 नवाथे येथील मल्टिप्लेक्सच्या जागेवर दिनांक 29/06/2017 रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्रमांक 8 व 9 रद्द करुन निर्णया बाबत.

**ठराव क्रमांक 33 -** नवाथे मल्टिप्लेक्स मौजा पेठ येथील भु. क्र. 07, शिट क्र. 64, सर्व्हे नं. 40 या जागेवर नवाथे मल्टिप्लेक्स बांधण्या ऐवजी मनपा स्वखर्चाने बांधकाम करणे बाबत विषय चर्चेला येवून ठराव मंजुर करण्यात आला होता. परंतु महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता मनपा स्वनिधीतुन 100 कोटीचे बांधकाम मनपास करणे शक्य होणार नाही. नवाथे मल्टीप्लेक्सची जागा रिकामी असून तेथे मंदिराचे अतिक्रमण, हॉकर्स अतिक्रमण, अनधिकृत पार्किंग होत असून जागेचा अनधिकृत वापर सुरु आहे. त्यामुळे येथे भविष्यात अनधिकृत बांधकाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

वस्तुस्थिती पाहता नवाथे येथील जागेवर बांधा वापरा व हस्तांतरीत करा (BOT) तत्वावर, एक रकमी Premium घेवून बांधकाम विकासकास 30 वर्षाकरीता दिल्यास जागा विकसीत करुन मनपास मिळेल. त्यामुळे मनपास एक रक्कमी 10 ते 12 कोटी इतका Premium मिळेल. तो Premium Fixed deposit केल्यास 30 वर्षाच्या कालावधीत अंदाजे 100 कोटी पर्यंत उत्पन्न अमरावती महानगरपालिकेस मिळेल व महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल. तसेच 30 वर्षानंतर जागे सहित इमारत मनपास हस्तांतरीत होईल.

सबब, मनपाचे हित पाहता नवाथे मल्टिप्लेक्स या जागेवर बांधा, वापरा व हस्तांतरीत करा (BOT) तत्वावर बांधकाम करण्यास व एक रकमी रक्कम (Premium) विकासका कडून घेण्यास मान्यता प्रदान करणे करीता विषय सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

**स्वा./-**
**नगरसचिव,**
**महानगरपालिका,अमरावती**

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.

**स्वा./-**
**प्रशासक,**
**महानगरपालिका,अमरावती**